नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १३/०५/२०२५ (मंगळवार)**

---

## खुनाचा गुन्हा ६ तासात उघड, २ आरोपी अटक
## नरखेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन नरखेड :—** दिनांक ११/०५/२०२५ रोजी **मृतक नामे शिवशंकर गणुजी धुर्वे, वय ३४ वर्ष, रा.बिरोली झिलपा, तह.मुलताई, जि.बैतुल म,प्र.** हा गायमुख शिवार,नरखेड येथे शेतात काम करत असताना बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने त्याला ग्रा.रू. नरखेड येथे उपचारा करीता नेले असता वैदयकीय अधिकारी यांनी त्याला मृत घोषीत केले. वैदयकीय अधिकारी यांनी दिनांक १२/०५/२०२५ रोजी प्रेतावर शवविच्छेदन करुन अडवान्स पी.एम. रिपोर्ट मध्ये **गळा दाबुन मृत्यु झाला आहे** असा अभिप्राय दिल्याने मृतकाचे भाऊ फिर्यादी नामे दिनदयाल गणुजी धुर्वे, वय ३२ वर्ष, रा. बिरोली झिल्पा, ता. मुलताई, जि. बैतुल म.प्र.यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस ठाणे नरखेड येथे अज्ञात अरोपी विरूध्द अप क्रमांक ३२२/२०२५ कलम १०३(१) भारतीय न्याय संहिता अन्वये खुनाचा गुन्हा नोंद केला आहे.

मा. श्री. रमेश धुमाळ, प्रभारी पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा आणि मा. श्री. अनिल मस्के,सहायक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी काटोल विभाग (प्रभारी) यांचे मार्गदर्शनात नरखेड पोलीस स्टेशन चे गुन्हे प्रकटीकरण पथकाने तात्काळ सदर गुन्हयाचा तपास सुरू केला. पोलीसांनी गुप्तबातमीदारा मार्फतीने माहीती काढुन **१) महीला आरोपी (मृतकची पत्नी) आणि २) शांताराम पुरणसिंग दिदावत, रा.वार्ड क्र.०५ बेलोना तह. नरखेड** यांना ताब्यात घेवुन त्यांचे कडे गुन्हया संदर्भात कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता दोघांनी संगणमताने अनैतिक संबधाचे कारणावरून मृतक नामे शिवशंकर गणुजी धुर्वे वय ३४ वर्ष रा.बिरोली झिलपा तह.मुलताई जि.बैतुल म,प्र. याचा खुन केल्याबाबत माहीती पोलीसांना प्राप्त

झाली. **अवघ्या ६ तासात नरखेड पोलीसांनी सदर गुन्हयाची उकल करीत नमुद दोन्ही आरोपीतांना अटक केली आहे. मा. न्यायालयाने दिनांक १४/०५/२०२५ रोजी पर्यंत दोन्ही आरोपींचा पोलीस कोठडी रिमांड मजुंर केला आहे.**

## सट्टापट्टी लिहणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद
## स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांची कारवाई

दिनांक १२/०५/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखा यांचे पथक अवैध धंदयावर कारवाई कामी पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गोपनीय माहिती मिळाली की, पोलीस स्टेशन नरखेड अंतर्गत मौजा बस स्टॉप सावरगाव येथे २ इसम कागदावर वरली मटक्याचे आकडे लिहुन सट्टीपट्टी चालवित आहे. अशी माहिती मिळताच तात्काळ पोलीसांनी घटनास्थळी जावुन कारवाई केली असता आरोपी नामे **१. श्रावण पंजाब निहारे, वय ५४ वर्ष, रा. मालपुर, ता. नरखेड, २.कीशोर भोजरे, वय ५० वर्ष, रा. अंबोला, ता. नरखेड हे आरोपी सट्टापट्टी चालवितांना मिळुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीतांची अंगझडती घेवुन असता त्याचे ताब्यातुन सट्टापट्टीचे साहीत्य, रोख रक्कम, आणि १ ॲंड्रॉइड मोबाईल असा एकुण ११,३७५/—रू मुद्देमाल केला आहे.**

नमुद दोन्ही आरोपीतांविरूद्ध कलम १२ अ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने